**नाशिक महानगरपालिका, नाशिक**
**घनकचरा व्यवस्थापन विभाग**
**राजीव गांधी भवन, मुख्यालय, शरणपूर रोड, नाशिक.**

---

## लाड पागे समिती शिफारशीनुसार दिवंगत/सेवानिवृत्त सफाई कर्मचारी यांचे वारसांना नियुक्ती देणेबाबत निवड समिती बैठक दिनांक २७.१२.२०२२
## इतिवृत्त क्रमांक – ३१

नाशिक महानगरपालिका आस्थापनेवरील लाड कमिटीच्या शिफाराशीनुसार वारसाहक्काने नियुक्ती करीता रिक्त असलेली पदे भरणेकामी कर्मचारी निवड समितीची दिनांक २७.१२.२०२२ रोजी सकाळी ११.१५ वाजता अतिरिक्त आयुक्त, (सेवा) नाशिक महानगरपालिका, नाशिक यांचे दालनात संपन्न झाली. सदर बैठकीस खालीलप्रमाणे अधिकारी तथा समिती सदस्य बैठकीस उपस्थित होते.

१) अतिरिक्त आयुक्त (सेवा) :- अध्यक्ष
२) उपआयुक्त( प्रशासन ) :- सदस्य
३) उपआयुक्त (समाजकल्याण) :- सदस्य
४) मुख्य लेखापरिक्षक :- सदस्य
५) मुख्य वित्त व लेखाधिकारी :- सदस्य
६) संचालक, घनकचरा व्यवस्थापन :- सदस्य सचिव

सदर बैठकीस कर्मचारी निवड समितीचे उपरोक्त सदस्य उपस्थित असल्याने समितीचे कामकाजास सुरुवात झाली. विषयसूचीमधील नमुद विषयांच्या अनुषंगाने चर्चेस सुरूवात करणेत आली.



Scanned with CamScanner

**संदर्भ :** (१) महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन परिपत्रक क्रमांक सफाई २०११ / प्र.क्र.३२७ / विघयो २, दिनांक २१ ऑक्टोबर २०११
(२) महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन परिपत्रक क्रमांक सफाई २०१४/प्र.क्र.०७/ महामंडळे, दिनांक २६ फेब्रुवारी, २०१४
(३) महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक: सफाई-२०१५ प्र.क्र. २६८/महामंडळे,मंत्रालय विस्तार भवन,मुंबई, दिनांक ११ मार्च, २०१६

| अ.क्र. | दिवंगत/ सेवानिवृत्त सफाई कर्मचाऱ्याचे नाव | नियुक्ती देणे कामी प्रस्तावित केलेल्या वारसाचे नाव | निर्देश |
|---|---|---|---|
| १ | **श्री..रविंद्र बारकु लोखंडे** (मयत सफाई कामगार) | **श्री.सुधांशु रविंद्र लोखंडे** (मुलगा) | कर्मचारी निवड समितीच्या निर्देशानुसार कागदपत्रांची पुर्तता तसेच, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन परिपत्रक क्र. सफाई २०११/ प्र. क्र. ३२७/ विघयो -२ दि.२१ ऑक्टोबर २०११ च्या परिपत्रकातील १ अ (२) या तरतुदीनुसार 'मुलगा' या नात्याने **श्री.सुधांशु रविंद्र लोखंडे, हे सफाई कामगार पदावर नियुक्तीस पात्र होत असल्याची शिफारस करण्यात येत आहे.** |
| २ | **कै.प्रशांत वसंत चव्हाण** (मयत सफाई कामगार) | **श्री.दिनेश वसंत चव्हाण** (भाऊ) | दि.२०.१०.२०२२ रोजीचे कर्मचारी निवड समितीने निर्देशीत केले नुसार श्री.दिनेश वसंत चव्हाण यांनी सादर केलेल्या अद्यावत कुटुंब शिधपत्रीकेवरुन ते एकत्र कुटुंबात राहत असल्याची खात्री होत आहे.<br>परंतु, लाड समितीच्या शिफारशीनुसार सफाई कामगारांच्या वारसाहक्काच्या अंमलबजावणीबाबत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, सा.प्र.वि.,नगरविकास विभाग यांनी निर्गमित केलेल्या वेगवेगळया शासन निर्णय / परिपत्रके यांच्यातील तरतुदीनुसार सफाई कामगारांच्या वारसाहक्कानुसार सेवेत समाविष्ट करतांना वारसदारांच्या पात्रतेनुसार वारस म्हणुन अविवाहित सफाई कामगारांच्या बाबतीत भाऊ / भावाचा पात्र वारस म्हणुन कोठेही तरतुद नाही. तसेच, मयत कर्मचाऱ्याचे स्वत:चे कुटुंबात पत्नी / मुलगा / मुलगी इ. कोणीही अवलंबुन असलेले पात्र वारस नाहीत.<br>सबब, **कै.प्रशांत वसंत चव्हाण** मयत सफाई कामगार यांचे रिक्तपदी **श्री.दिनेश वसंत चव्हाण हे नियुक्तीस पात्र ठरत नसल्याने त्यांचे नियुक्तीस शिफारस करता येणार नाही.** |
| ३ | **श्रीम.नंदा प्रदिप जिनवाल** (स्वेच्छानिवृत्त सफाई कामगार) | **श्री.मयुर प्रदिप जिनवाल** (मुलगा) | कर्मचारी निवड समितीच्या निर्देशानुसार कागदपत्रांची पुर्तता तसेच, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन परिपत्रक क्र. सफाई २०११/ प्र. क्र. ३२७/ विघयो -२ दि.२१ ऑक्टोबर २०११ च्या परिपत्रकातील १ अ (२) या तरतुदीनुसार 'मुलगा' या नात्याने **श्री. मयुर प्रदिप जिनवाल, हे सफाई कामगार पदावर नियुक्तीस पात्र होत असल्याची शिफारस करण्यात येत आहे.** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **(डॉ.आवेश पलोड)** | **(नरेंद्र महाजन )** | **(बी. डी. सोनकांबळे)** | **(नितिन नार)** | **(मनोज घोडेपाटील )** | **(अशोक आत्राम)** |
| **संचालक,घ.व्य.वि** | **मुख्य वित्त व लेखाधिकारी** | **मुख्य लेखापरिक्षक** | **उपआयुक्त (समाजकल्याण )** | **उपआयुक्त (प्र.)** | **अतिरिक्त आयुक्त (सेवा)** |



Scanned with CamScanner

| अ.क्र. | दिवंगत/ सेवानिवृत्त सफाई कर्मचाऱ्याचे नाव | नियुक्ती देणे कामी प्रस्तावित केलेल्या वारसाचे नाव | निर्देश |
|---|---|---|---|
| ४ | **सौ.कमल त्रिकम खिमसुरीया**<br>(नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त) | **सौ.त्रिवेणी राजेश खिमसुरीया**<br>(सुन) | सौ.कमल त्रिकम खिमसुरीया, सेवानिवृत्त सफाई कामगार यांचे रिक्तपदी त्यांची मुलगी कु.ज्योती त्रिकम खिमसुरीया यांना दिनांक ०३.११.२०१८ रोजी सफाई कामगार या पदावर नियुक्ती दिली. परंतु कु.ज्योती खिमसुरीया यांची क. लिपीक पदाची मागणी असल्याने सफाई कामगार पदाची नियुक्ती मान्य नसल्याने तीने आदेश न स्विकारल्याने त्यांची दुसरी मुलगी मिना खिमसुरीया यांनी नोकरी मिळणे बाबत अर्ज केला. तथापि, १ वर्षाचे आत अर्ज सादर न केल्याने तिला देखील नोकरी नाकारणेत आल्याने सौ.कमल त्रिकम खिमसुरीया, यांनी मा.आयुक्त महोदयांकडे अर्ज सादर करुन त्यांचे रिक्तपदी कोणाचीही नेमणुक झालेली नसुन त्यांचे वृध्दत्व बघता,पुढील आयुष्याबाबत सांभाळ होणेकामी मा.शासनाने दिलेल्या अधिकाराचा वापर करुन त्यांची सुन सौ. त्रिवेणी राजेश खिमसुरीया यांना मनपा सेवेत सामावून घेऊन न्याय द्यावा अशी विनंती नमुद केल्याने मा. आयुक्त महोदय यांनी सदरचे प्रकरण पुर्नविलोकन / पुनःर्जिवीत करुन कर्मचारी निवड समितीने सदर प्रस्तावाची छाननी करुन कमिटीचा निर्णय सादर करणेस आदेशीत केले आहे.<br>त्यानुसार, सदर प्रस्तावाची छाननी केलेप्रमाणे **सौ. त्रिवेणी राजेश खिमसुरीया यांनी विहित मुदतीत म्हणजे १ वर्षाचे आत अर्ज सादर न करता, सेवानिवृत्त सफाई कामगाराच्या निवृत्ती दिनांकाच्या आदेशाच्या ४ वर्ष एवढया विलंबाने अर्ज सादर केल्याने सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन परिपत्रक क्र. सफाई २०११/ प्र. क्र. ३२७/ विघयो -२ दि.२१ ऑक्टोबर २०११ च्या परिपत्रकातील १ (उ) या तरतुदीनुसार त्या नियुक्तीस पात्र ठरत नसल्याने त्यांची नियुक्तीस शिफारस करता येत नाही**<br>[illegible] |

(डॉ.आवेश पलोड)
संचालक,घ.व्य.वि

(नरेंद्र महाजन )
मुख्य वित्त व लेखाधिकारी

(बी. जी. सोमकांबळे)
मुख्य लेखापरिक्षक

(नितिन नेर)
उपआयुक्त (समाजकल्याण )

(मनोज घोडेपाटील )
उपआयुक्त (प्र.)

(अशोक आत्राम)
अतिरिक्त आयुक्त (सेवा)



Scanned with CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | **श्री.अशोक सुकदेव उशिरे**<br>(स्वेच्छानिवृत्त सफाई कामगार) | **श्री.अक्षय अशोक उशिरे**<br>(मुलगा) | नाशिक महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियमान्वये स्वच्छता निरिक्षक नेमणुकी करीता संबंधित कामाचा किमान ०५ वर्षाचा अनुभव ही अर्हता असणे आवश्यक असुन, श्री.अक्षय अशोक उशिरे यांनी अनुभवाबाबत कोणतेही दस्त सादर केलेले नाही. तसेच, सामान्य प्रशासन विभाग,शासन परिपत्रक क्रमांक :- बीसीसी-२०१८/प्र.क्र.२७/१६- ब (सी), दिनांक १९ एप्रिल २०१८ च्या परिपत्रक सुचना २ ब) मधील तरतुदीनुसार केवळ मेहतर व वाल्मिकी या जातींच्या उमेदवारांची, त्यांच्या जातीचा विचार करुन नव्हे, तर त्यांची शैक्षणिक अर्हता विचारात घेऊन त्यांची नेमणुक करण्यात येईल, असे नमुद असल्याने श्री.अक्षय उशिरे हे मेहतर व वाल्मिकी जातीचे नसल्याने सदर ते स्वच्छता निरिक्षक पदाकरीता अपात्र ठरत आहे.<br>तथापि, कर्मचारी निवड समितीच्या निर्देशानुसार कागदपत्रांची पुर्तता तसेच, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन परिपत्रक क्र. सफाई २०११/ प्र. क्र. ३२७/ विघयो -२ दि.२१ ऑक्टोबर २०११ च्या परिपत्रकातील १ अ (२) या तरतुदीनुसार 'मुलगा' या नात्याने **श्री. अक्षय अशोक उशिरे, हे सफाई कामगार पदावर नियुक्तीस पात्र होत असल्याची शिफारस करण्यात येत आहे.** |
| ६ | **श्री.रविंद्र बाबुराव काळे**<br>(स्वेच्छानिवृत्त स्वच्छता मुकादम) | **श्री.शुभम रविंद्र काळे**<br>(मुलगा) | नाशिक महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियमान्वये स्वच्छता निरिक्षक नेमणुकी करीता संबंधित कामाचा किमान ०५ वर्षाचा अनुभव ही अर्हता असणे आवश्यक असुन, श्री.शुभम रविंद्र काळे यांनी अनुभवाबाबत कोणतेही दस्त सादर केलेले नाही. तसेच, सामान्य प्रशासन विभाग,शासन परिपत्रक क्रमांक :- बीसीसी-२०१८/प्र.क्र.२७/१६- ब (सी), दिनांक १९ एप्रिल २०१८ च्या परिपत्रक सुचना २ ब) मधील तरतुदीनुसार केवळ मेहतर व वाल्मिकी या जातींच्या उमेदवारांची, त्यांच्या जातीचा विचार करुन नव्हे, तर त्यांची शैक्षणिक अर्हता विचारात घेऊन त्यांची नेमणुक करण्यात येईल, असे नमुद असल्याने श्री.शुभम काळे हे मेहतर व वाल्मिकी जातीचे नसल्याने ते स्वच्छता निरिक्षक पदाकरीता अपात्र ठरत आहे.<br>तथापि,कर्मचारी निवड समितीच्या निर्देशानुसार कागदपत्रांची पुर्तता तसेच, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन परिपत्रक क्र. सफाई २०११/ प्र. क्र. ३२७/ विघयो -२ दि.२१ ऑक्टोबर २०११ च्या परिपत्रकातील १ अ (२) या तरतुदीनुसार 'मुलगा' या नात्याने **श्री. शुभम रविंद्र काळे, हे सफाई कामगार पदावर नियुक्तीस पात्र होत असल्याची शिफारस करण्यात येत आहे** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| (डॉ.आवेश पलोड)<br>संचालक,घ.व्य.वि | (नरेंद्र महाजन )<br>मुख्य वित्त व लेखाधिकारी | (बी. जी. सोनकांबळे)<br>मुख्य लेखापरिक्षक | (नितिन नेर)<br>उपआयुक्त (समाजकल्याण ) | (मनोज घोडेपाटील )<br>उपआयुक्त (प्र.) | (अशोक आत्राम)<br>अतिरिक्त आयुक्त (सेवा) |



Scanned with CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| ७ | **श्री. निरंजन धोंडीराम काळे**<br>(स्वेच्छानिवृत्त सफाई कामगार) | **श्री.भुषण निरंजन काळे**<br>(मुलगा) | कर्मचारी निवड समितीच्या निर्देशानुसार कागदपत्रांची पुर्तता तसेच, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन परिपत्रक क्र. सफाई २०११/ प्र. क्र. ३२७/ विघयो -२ दि.२१ ऑक्टोबर २०११ च्या परिपत्रकातील १ अ (२) या तरतुदीनुसार 'मुलगा' या नात्याने **श्री. भुषण निरंजन काळे, हे सफाई कामगार पदावर नियुक्तीस पात्र होत असल्याची शिफारस करण्यात येत आहे.** |
| ८ | **श्री.रंगनाथ लहू काळे**<br>(स्वेच्छानिवृत्त सफाई कामगार) | **श्री.अनिकेत रंगनाथ काळे**<br>(मुलगा) | कर्मचारी निवड समितीच्या निर्देशानुसार कागदपत्रांची पुर्तता तसेच, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन परिपत्रक क्र. सफाई २०११/ प्र. क्र. ३२७/ विघयो -२ दि.२१ ऑक्टोबर २०११ च्या परिपत्रकातील १ अ (२) या तरतुदीनुसार 'मुलगा' या नात्याने **श्री.अनिकेत रंगनाथ काळे, हया सफाई कामगार पदावर नियुक्तीस पात्र होत असल्याची शिफारस करण्यात येत आहे.** |
| ९ | **कै.जितेंद्र भिमराव साळवे**<br>(मयत सफाई कामगार) | **श्रीम.योगीता जितेंद्र साळवे**<br>(पत्नी) | कै.जितेंद्र भिमराव साळवे,यांनी हयात असतांना वारस नामनिर्देशन पत्र सादर केले नसल्याकारणे त्यांची पत्नी श्रीम.योगीता जितेंद्र साळवे यांनी मा.न्यायालयाकडील वारस दाखला सादर न करता, मा.तहसीलदार,नाशिक यांचेकडील वारस दाखला सादर केले असल्याचे निदर्शनास येत आहे.<br>तथापि, **कै.जितेंद्र भिमराव साळवे यांची वारस पत्नी असलेबाबत श्रीम. योगीता जितेंद्र साळवे यांचे विवाह नोंदणी प्रमाणपत्र किंवा मा.दिवाणी न्यायालयाकडील वारस प्रमाणपत्र सादर करणेस श्रीम. योगीता जितेंद्र साळवे यांना घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत लेखी कळविणेत यावे. सदरची पुर्तता झालेनंतर प्रस्ताव आगामी कर्मचारी निवड समितीसमोर सादर करणेत यावा. अशी शिफारस करण्यात येत आहे.** |
| १० | **श्री. कमलाकर युवराज काळे**<br>(स्वेच्छानिवृत्त सफाई कामगार) | **श्री. दिपक कमलाकर काळे**<br>(मुलगा) | कर्मचारी निवड समितीच्या निर्देशानुसार कागदपत्रांची पुर्तता तसेच, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन परिपत्रक क्र. सफाई २०११/ प्र. क्र. ३२७/ विघयो -२ दि.२१ ऑक्टोबर २०११ च्या परिपत्रकातील १ अ (२) या तरतुदीनुसार 'मुलगा' या नात्याने **श्री. दिपक कमलाकर काळे, हे सफाई कामगार पदावर नियुक्तीस पात्र होत असल्याची शिफारस करण्यात येत आहे.** |
| ११ | **श्री. दिपक नामदेव शिरसाठ**<br>(स्वेच्छानिवृत्त सफाई कामगार) | **श्री.अनुराग दिपक शिरसाठ**<br>(मुलगा) | कर्मचारी निवड समितीच्या निर्देशानुसार कागदपत्रांची पुर्तता तसेच, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन परिपत्रक क्र. सफाई २०११/ प्र. क्र. ३२७/ विघयो -२ दि.२१ ऑक्टोबर २०११ च्या परिपत्रकातील १ अ (२) या तरतुदीनुसार 'मुलगा' या नात्याने **श्री. अनुराग दिपक शिरसाठ, हे सफाई कामगार पदावर नियुक्तीस पात्र होत असल्याची शिफारस करण्यात येत आहे.** |
| १२ | **श्री.रामदास बाजीराव भालेराव**<br>(स्वेच्छानिवृत्त सफाई कामगार) | **श्री..देवेन रामदास भालेराव**<br>(मुलगा) | कर्मचारी निवड समितीच्या निर्देशानुसार कागदपत्रांची पुर्तता तसेच, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन परिपत्रक क्र. सफाई २०११/ प्र. क्र. ३२७/ विघयो -२ दि.२१ ऑक्टोबर २०११ च्या परिपत्रकातील १ अ (२) या तरतुदीनुसार 'मुलगा' या नात्याने **श्री. देवेन रामदास भालेराव, हे सफाई कामगार पदावर नियुक्तीस पात्र होत असल्याची शिफारस करण्यात येत आहे.** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **(डॉ.आवेश पलोड)**<br>**संचालक,घ.व्य.वि** | **(नरेंद्र महाजन )**<br>**मुख्य वित्त व लेखाधिकारी** | **(बी. जी. सोनकांबळे)**<br>**मुख्य लेखापरिक्षक** | **(नितीन नेर)**<br>**उपआयुक्त (समाजकल्याण )** | **(मनोज घोडेपाटील )**<br>**उपआयुक्त (प्र.)** | **(अशोक आत्राम)**<br>**अतिरिक्त आयुक्त (सेवा)** |



Scanned with CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| १३ | **श्री.वसंत धोंडीराम पंडीत**<br>(स्वेच्छानिवृत्त सफाई कामगार) | **श्री. रोशन वसंत पंडीत**<br>(मुलगा) | श्री.रोशन वसंत पंडीत यांची शैक्षणिक पात्रता डिप्लोमा सिव्हील इंजि. निदर्शनास येत आहे. परंतु, सातपुर विभागाने सादर केलेल्या प्रस्तावात व श्री.रोशन वसंत पंडीत यांनी केलेल्या अर्जात शैक्षणिक अर्हतेनुसार नियुक्ती मिळणे बाबत नमुद केलेले नाही. तसेच, सामान्य प्रशासन विभाग,शासन परिपत्रक क्रमांक :- बीसीसी-२०१८/प्र.क्र.२७/१६- ब (सी), दिनांक १९ एप्रिल २०१८ च्या परिपत्रक सुचना २ ब) मधील तरतुदीनुसार केवळ मेहतर व वाल्मिकी या जातींच्या उमेदवारांची, त्यांच्या जातीचा विचार करुन नव्हे, तर त्यांची शैक्षणिक अर्हता विचारात घेऊन त्यांची नेमणुक करण्यात येईल, अशी स्पष्ट तरतुद नमुद आहे.<br>तथापि,कर्मचारी निवड समितीच्या निर्देशानुसार कागदपत्रांची पुर्तता तसेच, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन परिपत्रक क्र. सफाई २०११/ प्र. क्र. ३२७/ विघयो -२ दि.२१ ऑक्टोबर २०११ च्या परिपत्रकातील १ अ (२) या तरतुदीनुसार 'मुलगा' या नात्याने **श्री. रोशन वसंत पंडीत, हे सफाई कामगार पदावर नियुक्तीस पात्र होत असल्याची शिफारस करण्यात येत आहे.** |
| १४ | **श्री.लक्ष्मण वामन पगारे**<br>(सेवानिवृत्त स्वच्छता मुकादम) | **श्री. प्रफुल्ल लक्ष्मण पगारे**<br>(मुलगा) | दि.२०.१०.२०२२ रोजीचे कर्मचारी निवड समिती बैठकीसमोर सादर केलेल्या प्रस्ताव सुचिमध्ये नमुदप्रमाणे श्री.प्रफुल्ल लक्ष्मण पगारे,हे सफाई कामगार पदावर नियुक्तीस पात्र होत असल्याची शिफारस करण्यात येत असलेबाबत निर्णय घेणेत आला.परंतु, श्री.प्रफुल्ल लक्ष्मण पगारे यांनी B.E. (Electrical) शिक्षण पुर्ण केले असल्याने त्यांनी त्यांचे शैक्षणिक अर्हतेनुसार सहा. कनिष्ठ अभियंता या पदावर नोकरीत सामावुन घेणेस विनंती अर्ज केलेला आहे. अर्जदारचे मागणीप्रमाणे बैठकीमध्ये निर्णय होणे आवश्यक असल्याने मा.आयुक्त सो यांचे मान्यतेने सदरचे प्रकरण कर्मचारी निवड समिती समोर सादर करणेत आले असुन, नाशिक महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियमान्वये सहा. कनिष्ठ अभियंता (विद्युत) या पदाच्या नामनिर्देशन नेमणुकीकरीता संबंधित कामाचा किमान ०३ वर्षाचा अनुभव ही अर्हता असणे आवश्यक असुन, प्रफुल्ल लक्ष्मण पगारे यांनी अनुभवाबाबत कोणतेही दस्त सादर केलेले नाही. तसेच, सामान्य प्रशासन विभाग,शासन परिपत्रक क्रमांक :- बीसीसी-२०१८/प्र.क्र.२७/१६- ब (सी), दिनांक १९ एप्रिल २०१८ च्या परिपत्रक सुचना २ ब) मधील तरतुदीनुसार केवळ मेहतर व वाल्मिकी या जातींच्या उमेदवारांची, त्यांच्या जातीचा विचार करुन नव्हे, तर त्यांची शैक्षणिक अर्हता विचारात घेऊन त्यांची नेमणुक करण्यात येईल, असे नमुद असल्याने श्री.प्रफुल्ल लक्ष्मण पगारे हे मेहतर व वाल्मिकी जातीचे नसल्याने सदर ते सहा. कनिष्ठ अभियंता (विद्युत) पदाकरीता अपात्र ठरत आहे.<br>तथापि,कर्मचारी निवड समितीच्या निर्देशानुसार कागदपत्रांची पुर्तता तसेच, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन परिपत्रक क्र. सफाई २०११/ प्र. क्र. ३२७/ विघयो -२ दि.२१ ऑक्टोबर २०११ च्या परिपत्रकातील १ अ (२) या तरतुदीनुसार 'मुलगा' या नात्याने **श्री. प्रफुल्ल लक्ष्मण पगारे, हे सफाई कामगार पदावर नियुक्तीस पात्र होत असल्याची शिफारस करण्यात येत आहे.** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **(डॉ.आवेश पलोड)**<br>**संचालक,घ.व्य.वि** | **(नरेंद्र महाजन )**<br>**मुख्य वित्त व लेखाधिकारी** | **(बी. जी. सोनकांबळे)**<br>**मुख्य लेखापरिक्षक** | **(नितिन नेर)**<br>**उपआयुक्त (समाजकल्याण )** | **(मनोज घोडेपाटील )**<br>**उपआयुक्त (प्र.)** | **(अशोक आत्राम)**<br>**अतिरिक्त आयुक्त (सेवा)** |



Scanned with CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| १५ | **कै.अरुण अशोक बर्वे**<br>मयत सफाई कामगार | **श्री. अश्विन अशोक बर्वे**<br>भाऊ - (नामनिर्देशित व्यक्ती) | सदर प्रकरण दिनांक ३१.०५.२०२२ रोजीच्या कर्मचारी निवड समितीच्या निर्देशान्वये श्री.अश्विन अशोक बर्वे यांनी मा.जिल्हा शल्य रुग्णालय,नाशिक यांचेकडेस नेत्र तपासणी करुन मा.जिल्हा शल्य चिकित्सक, नाशिक यांचेकडील दि.२२.०७.२०२२ रोजीचे पत्र सादर केले. तसेच, यापुर्वी श्री.अश्विन अशोक बर्वे यांना ते नियुक्तीस अपात्र होत असल्याने त्यांचा अर्ज निकाली काढणेत आला असल्याने श्री.अश्विन अशोक बर्वे यांनी सादर केलेल्या अपिल अर्जाचे अनुषंगाने मा.आयुक्त महोदय यांनी सदरचे प्रकरण पुर्नजिवीत करणेस दि.२३.११.२०२२ रोजी मान्यता देऊन सदरचे प्रकरण कमिटीसमोर सादर करणेस आदेशीत केले आहे.<br>परंतु, लाड समितीच्या शिफारशीनुसार सफाई कामगारांच्या वारसाहक्काच्या अंमलबजावणीबाबत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, सा.प्र.वि.,नगरविकास विभाग यांनी निर्गमित केलेल्या वेगवेगळया शासन निर्णय / परिपत्रके यांच्यातील तरतुदीनुसार सफाई कामगारांच्या वारसाहक्कानुसार सेवेत समाविष्ट करतांना वारसदारांच्या पात्रतेनुसार वारस म्हणुन अविवाहित सफाई कामगारांच्या बाबतीत भाऊ / भावाचा पात्र वारस म्हणुन कोठेही तरतुद नाही. तसेच, मयत कर्मचाऱ्याचे स्वत:चे कुटुंबात पत्नी / मुलगा / मुलगी इ. कोणीही अवलंबुन असलेले पात्र वारस नाहीत.<br>सबब, **कै.अरुण अशोक बर्वे मयत सफाई कामगार यांचे रिक्तपदी श्री. अश्विन अशोक बर्वे, हे नियुक्तीस पात्र ठरत नसल्याने त्यांचे नियुक्तीस शिफारस करता येणार नाही.** |

लाड कमिटी शिफारशीनुसार वारसाहक्काने नियुक्ती मिळणेस वारसाच्या अर्जाप्रमाणे सेवानिवृत्ती / स्वेच्छानिवृत्त कर्मचाऱ्याचा सुध्दाअर्ज असणे आवश्यक आहे.त्याबाबत घनकचरा व्यवस्थापन विभागाने सुचना निर्गमित करावी.

वरील प्रमाणे सांगोपांग चर्चा होऊन, कर्मचारी निवड समितीसमोर चर्चेसाठी ठेवणेत आलेल्या विषयसूचीनुसार सादर विषयांबाबत चर्चा करणेत आली. दिलेले निर्देश व सुचनांनुसार कार्यपुर्ती करणेत यावी असे समितीने सुचित करून बैठक संपन्न झाल्याचे जाहिर केले.

**(डॉ.आवेश पलोड )**
**संचालक, घनकचरा व्यवस्थापन विभाग,**
**नाशिक महानगरपालिका, नाशिक**

**(नरेंद्र महाजन)**
**मुख्य वित्त व लेखाधिकारी**
**नाशिक महानगरपालिका, नाशिक**

**(बी. जी. सोनकांबळे)**
**मुख्य लेखापरिक्षक**
**नाशिक महानगरपालिका, नाशिक**

**(नितिन नेर)**
**उपआयुक्त (समाजकल्याण )**
**नाशिक महानगरपालिका, नाशिक**

**(मनोज घोडेपाटील)**
**उपआयुक्त (प्र.)**
**नाशिक महानगरपालिका, नाशिक**

**(अशोक आत्राम)**
**अतिरिक्त आयुक्त,सेवा**
**नाशिक महानगरपालिका, नाशिक**

**प्रत:- माहितीस्तव सविनय सादर**
मा.आयुक्त सो., मनपा, नाशिक



Scanned with CamScanner